MHGA040007792025

दाखल तारीख : १५.१२.२०२५
नोंदणी तारीख : १५.१२.२०२५
निकाल तारीख : ०४.०५.२०२६
कालावधी : ००वर्ष, ०४म.,१९दि.

<u>नि.क्र.२१</u>

| | |
|---|---|
| | **<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय</u>**<br>**<u>(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)</u>**<br>**(न्यायनिर्णयाची तारीख :०४/०५/२०२६)**<br>**नि.फौ.मा.क्र.९०/२०२५** |
| | अपराध क्र. :३३८/२०२५<br>पोलीस स्टेशन : आरमोरी |
| **<u>तक्रारदार</u>** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **<u>अधिवक्ता</u>** | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. उईके |
| **<u>आरोपी क्र.१</u>**<br><br><br>**<u>आरोपी क्र.२</u>**<br><br><br>**<u>आरोपी क्र.३</u>** | **मानिक श्रावण मानकर,**<br>वय ६३ वर्षे, व्यवसाय शेती,<br><br>**रितीक मोरेश्वर सयाम,**<br>वय २१ वर्षे, व्यवसाय शेती,<br><br>**राजेश्वर हनुजी दुमाने,**<br>वय ४५ वर्षे, व्यवसाय शेती,<br>सर्व राह. कोजबी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **<u>अधिवक्ता</u>** | आरोपींचे विधिज्ञ श्री ढोंगे |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | २२.०८.२०२५ |
| प्रथम खबरेची तारीख | २३.०८.२०२५ |
| आरोपपत्राची तारीख | १५.१२.२०२५ |
| दोषारोप तयार करण्याची तारीख | ०२.०२.२०२६ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | २९.०४.२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | काही नाही. |
| निकालाची तारीख | ०४.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | काही नाही. |

## आरोपींचा तपशिल

| क्र. | आरोपींचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटण्याची तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४६८ भा.ना.सु.सं. च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १<br>२<br>३ | मानिक श्रावण मानकर<br>रीतीक मोरेश्वर सयाम<br>राजेश्वर हनुजी दुमाने | कलम ३५(३) भा.न्या.सु.सं. सुचनापत्र दिले. | | ११८(१), ३(५) भा.न्या.सं. | निर्दोष | नाही | काही नाही |

.........................................................................................

## न्या य नि र्ण य
**(दिनांक ०४ मे, २०२६ रोजी घोषित)**

आरोपींवर भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ३(५) अन्वये दंडनिय अपराधांकरीता दोषारोप ठेवण्यात आले आहे.

**अभियोग पक्षाचे कथन** :-

२. फिर्यादी जालींद्र ताराचंद मानकर हा दि.२२.०८.२०२५ रोजी रात्रो ९.०० वाजता त्याचे आई, वडीलांसोबत जेवण करुन आपल्या घरी मौजा कोजबी येथे झोपला होता. त्यानंतर काही वेळाने त्याच्या घरा शेजारी भजनाचा कार्यक्रम साऊंड सर्वीसच्या माईकवर चालु होता व साऊंड सिस्टीमचा आवाज जास्त असल्याने त्या आजावामुळे त्याला झोपेतुन जाग आली. त्यानंतर फिर्यादीने कोणाच्या घरी भजनाचा कार्यक्रम चालु आहे म्हणुन घरा बाहेर निघुन पाहिले असता त्याच्या घरा शेजारील आरोपी मानिक श्रावण मानकर याच्या घरी साऊंड सिस्टीमवर भजनाचा कार्यक्रम चालु होता. त्यामुळे त्याने आरोपी क्र.२ ला फोन करुन आवाज कमी करण्यात सांगितले. त्यानंतर भजनाचा कार्यक्रम बंद करुन आरोपी हे फिर्यादीकडे आले आणि त्याला म्हणाले की, तु आम्हाला भजनाचा कार्यक्रमाचा आवाज कमी करण्यास सांगितला, तु मोठा साईना झाला. आरोपी क्र.१ ने त्याच्या हातातील काठीने फिर्यादीच्या पायावर मारला आणि खाली ढकलला. त्यामुळे त्याच्या उजव्या डोक्याच्या वरती मार लागला. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन, आरमोरी येथे रिपोर्ट दिली. सदर फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द अपराध क्र.३३८/२०२५, कलम ११८(१), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर प्रकरणाचा तपास पो.हवा. किशोर मेश्राम यांच्याकडे देण्यात आला. तपासी अंमलदार यांनी साक्षीदारांची बयाणे नोंदविली,

घटनास्थळ पंचनामा केला व आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

३. या न्यायालयाने आरोपींविरुध्द नि.क्र.१४ वर भा.न्या.सं.चे कलम ११८(१), ३(५) अन्वये दोषारोप ठेवले. दोषारोपातील आरोप आरोपींना वाचुन व समजावुन सांगण्यात आले. आरोपींनी गुन्हा कबूल नाही असे नि.क्र.१५ ते १७ वर सांगितले आणि संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. आरोपींविरुध्दचा आरोप सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादीला तपासले. आरोपींविरुध्द काहीही न आल्याने त्यांचे कलम ३५१(१)(ब) भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे बयाण नोंदविण्यात आले नाही. आरोपीने त्याच्या बचावाकरीता कोणतेही पुरावे सादर केलेले नाही.

४. वरील विवेचनावरुन खोलील मुद्दे माझे समोर उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणानुसार त्यांचे समोर नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे कायं दि.२२.०८.२०२५ रोजी २३.२० ते २३.५० वाजताचे दरम्यान मौजा कोजबी, ता. आरमोरी येथे आरोपींनी आपसी संगनमत करुन फिर्यादी जालींद्र ताराचंद मानकर याचे पायावर काठीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचविली, त्याद्वारे आरोपीने कलम **११८(१) सहकलम ३(५)** भा.न्या.सं. अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपींस दोषमुक्त करण्यात येते. |

## कारणे-मिमांसा

## फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष :-**

| सा. क्र. | नाव | नि.क्र. | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १. | जालींद्र ताराचंद मानकर | १९ | फिर्यादी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| | | निरंक | |

**क. <u>न्यायालयाकडुन साक्षीदार, जर असेल तर</u> :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील दस्तऐवजांची यादी

**अ. <u>फिर्यादी</u> :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ब. <u>बचाव</u> :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. <u>न्यायालय</u> :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड. <u>भौतीक वस्तु</u> :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

..........................................................................................................................

## <u>मुद्दा क्र.१ व २</u> :-

५. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द कथन सिद्ध करण्यासाठी फिर्यादी जालींद्र मानकर (सा.क्र.१) याला तपासले आहे. त्याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, आरोपी हे त्याचे नातेवाईक लागतात. त्याचा आरोपींसोबत दोन-दोन गोष्टी झाल्या होत्या व लोकांच्या सांगण्यावरुन आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. परंतु त्याने रिपोर्ट मधील मजकुर नाकारला. त्यामुळे सरकारी वकीलांनी त्याचा उलटतपास घेतला असता त्याने मान्य केले की, त्याचा आरोपी सोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाला आहे व त्याला सदर प्रकरण चालवायचे नाही.

६. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता फिर्यादी जालींद्र (सा.क्र.१) याला आरोपींनी लाकडी काठीने पायावर मारले आणि खाली ढकलले. त्यामुळे त्याच्या उजव्या डोळ्यावर मार लागला याबाबत काहीही आलेले नाही. फिर्यादी हा जखमी साक्षीदार आहे व त्याने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. अभिलेखावर

दाखल पुरसिस नि.क्र.१८ मध्ये फिर्यादीने नमुद केले आहे की, त्याचा आरोपींसोबत आपसी समझोता झाला आहे व त्याला आरोपी विरुध्द प्रकरण चालवायचे नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरुन आरोपींनी सदर गुन्हा केला हे अभियोग पक्ष संशयापलीकडे सिद्ध करु शकले नाही. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपींना देण्यात येतो. म्हणुन मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते व मुद्दा क्र.२ चे अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र.१ नामे **मानिक श्रावण मानकर,** आरोपी क्र.२ नामे **रीतीक मोरेश्वर सयाम** आणि आरोपी क्र.३ नामे **राजेश्वर हनुजी दुमाने** यांना भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१), ३(५) अन्वये दंडनीय अपराधांच्या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. जप्त एक बांबुची काठी मुल्यहिन असल्याने अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावी.

३. आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र आणि जामिन बंधपत्र रद्द करण्यात येते.

४. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) अन्वये प्रत्येकी रु.१५,०००/- प्रमाणे वैयक्तीक व जात मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.05.04 17:30:44 +0530

स्थळ : आरमोरी
दि.०४.०५.२०२६

(श्रीमती व्ही. व्ही. चौधरी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आरमोरी